Modern Education Society's
**NESS WADIA COLLEGE OF COMMERCE**
19, Late Prin, V. K. Joag Path, Pune – 411 001. Maharashtra State (India)
Website : https://ness.mespune.org/
Senior College ID/No.: PU/PN/C/021/1969
**Re-accredited by NAAC with an 'A' Grade (2014-2019)**
Affiliated to the University of Pune
and Recognised by Government of Maharashtra
Recognized Under Section 2 (f) and 12(B) of UGC Act, 1956.



College phone No. 020-26167024/ 6160909 Website: www.nesswadia.edu.in

**दिनांक : १८.०१.२०२६**

# सूचना

**मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांचा संदर्भ जावक क्र. आव्यप्रा/१७/२०२६ आदेशानुसार तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रक क्र.०८/२०२६ प्रमाणे दिनांक १९.०१.२०२६ (सोमवार) रोजी कार्यालयीन कामकाज, ग्रंथालय व (Senior & Junior) महाविद्यालय बंद राहील.**

**सदर सूचनेची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

**प्राचार्या**

डॉ. वृषाली रणधीर

महाराष्ट्राचा अमृत महोत्सव

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

## (आपत्ती व्यवस्थापन कक्ष)

दूरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- controlroompune@gmail.com

जावक क्र. आव्यप्रा/ 17 /2026 दिनांक : 17/01/2026

वाचले - 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.

2. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, यांचे परिपत्रक क्र.: संकिर्ण-2019/प्र.क्र.199/एसडी-2, दि. 2/08/2019

3. पोलिस उप आयुक्त,वाहतूक शाखा, पुणे शहर यांचे पत्र क्र. पोउपआ/वाह/नियो/329/2026, दि. 17/01/2026

**आदेश,**

**ज्याअर्थी,** पुणे ग्रँड चॅलेंज टूर 2026 या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा दिनांक 19 जानेवारी 2026 ते 23 जानेवारी 2026 या कालावधीत पुणे जिल्ह्यात होणार असून दि. 29 ऑक्टोबर 2025 रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. दिनांक 19 जानेवारी 2026 रोजी प्रोलॉग रेस होणार आहे.

**आणि ज्याअर्थी,** वाचले क्र. 3 अन्वये, पुणे ग्रँड टुर 2026 अनुषंगाने पुणे शहर हद्दीतील प्रोलॉग स्पर्धा दि. 19 जानेवारी 2026 रोजी आयोजीत करण्यात आली आहे. सदर स्पर्धेसाठी फर्ग्युसन कॉलेज रोड, गणेशखिंड रोड, जंगली महाराज रस्ता व त्यास जोडणारे इतर उपरस्ते हे सकाळी 09:00 वा. पासुन ते सायंकाळी 06.00 वा. दरम्यान वाहतुकीसाठी पुर्ण बंद ठेवावे लागणार आहे. त्यामुळे सदर रोडच्या परिसरातील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेता छत्रपती शिवाजीनगर घोले रोड, विश्रामबाग वाडा कसवा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध बाणेर, कोथरुड बावधन, सिंहगड रोड, वारजे कर्वेनगर पुणे महानगरपालिकेच्या या क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील शाळा महाविद्यालये व व्यावसायिक शैक्षणिक संस्था हे दि 19 जानेवारी 2026 रोजी पूर्ण वेळ बंद ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

**आणि ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम – 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे 'अध्यक्ष' आहेत व वाचले क्र. 2 च्या परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

**त्याअर्थी, मी जितेंद्र डूडी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 30 व 34 अन्वये आणि शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबईच्या शासन परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पुणे ग्रँड चॅलेंज टूर 2026 या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजीनगर घोले रोड, विश्रामबाग वाडा कसबा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध बाणेर, कोथरुड बावधन, सिंहगड रोड, वारजे कर्वेनगर या क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील सर्व अंगणवाडी, शासकीय व खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळा, आश्रमशाळा, मनपा व नगरपालिकेच्या शाळा, महाविद्यालये, आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र, व्यावसायिक शैक्षणिक संस्थाना दिनांक 19 जानेवारी 2026 रोजी होणाऱ्या प्रोलॉग रेस च्या दिवशी सुट्टी जाहिर करीत आहे.**

उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेश आज दिनांक 17 जानेवारी 2026 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

जिल्हा दंडाधिकारी पुणे

jitendra

(जितेंद्र डूडी)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

प्रत,

1. मा. आयुक्त, महानगरपालिका, पुणे
2. मा. पोलिस आयुक्त, पुणे शहर आयुक्तालय
3. शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक, जिल्हा परिषद, पुणे
4. निबंधक, सर्व विद्यापीठ-------------------, जि. पुणे
5. सर्व संबंधित ---------------------------

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

परिपत्रक क्र. ०८/२०२६

पुणे ग्रँड चॅलेंज टूर, २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा दिनांक १९ जानेवारी, २०२६ ते २३ जानेवारी, २०२६ या कालावधीत पुणे जिल्हयात होणार असून दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. पुणे शहरात दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी प्रोलॉग रेस होणार आहे.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांच्या संदर्भ जावक क्र.आव्यप्रा/१७/२०२६, दिनांक १७.०१.२०२६ रोजीच्या आदेशा नुसार पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने पुणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी नगर घोले रोड, विश्रामबाग वाडा कसबा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध बाणेर, कोथरुड बावधन, सिंहगड रोड, वारजे कर्वेनगर या क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील सर्व आंगणवाडी, शासकीय व खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळा, आश्रमशाळा, मनपा व नगरपालिकेच्या शाळा, महाविद्यालये, आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र, व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी होणाऱ्या प्रोलॉग रेस च्या दिवशी सुट्टी जाहिर करण्यात आलेली आहे.

सदर पार्श्वभूमीवर पुणे जिल्हयात होत असलेल्या पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेअंतर्गत होणाऱ्या प्रोलॉग रेस करिता विद्यापीठ कार्यालयास दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी सुट्टी जाहीर करणे आवश्यक आहे.

**याबाबत प्राप्त आदेशानुसार, या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सोमवार, दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी विद्यापीठ कार्यालयास सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.**

तथापि, विद्यापीठ आस्थापनेतील स्थावर विभाग, सुरक्षा विभाग व आरोग्य केंद्र हे विभाग अत्यावश्यक सेवा अतंर्गत येत असल्याने सदर विभागांचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरु राहील. सदर विभागातील संबंधितांना सदर दिवसाची पर्यायी रजा नंतर देय राहील. त्याचप्रमाणे कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरिता वरिष्ठांनी संबंधितास कार्यालयात बोलविल्यास त्यांना कार्यालयामध्ये त्वरीत उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

उपकुलसचिव
प्रशासन शिक्षकेतर कक्ष

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/१८२
दिनांक : १८/०१/२०२६

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

आपणास विनंती की, सदर परिपत्रकातील आशय संबंधितांच्या निदर्शनास आणावे.